महापालिका आयुक्त कार्यालय
अधिकार सुपूर्ति क्रमांक
मआ/ अधिकार सुपूर्ति/डीईएल/१४८६
दिनांक 7 NOV 2014

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा क्र. मआ/उआ(जिं.घ)/१७८
दिनांक ७/११/२०१४

:-अधिकार सुपूर्ती आज्ञापत्रः-

विषयः- घरबांधणी कर्ज या विभागाचे कामकाजाबाबत.

महानगरपालिकेतील सर्व संवर्गातील अधिकारी/सेवकांना घरबांधणी करिता काही अटी शर्तींवर अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.६/२८२ दि. १९/११/२०१२ ने मा. सल्लागार (कामगार)यांना देण्यात आले होते. तसेच अग्रिमाची परतफेड पूर्ण झालेल्या सेवकांचा घरकर्जाचा बोजा उतरविणे (Deed Release) या बाबतचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६९ (१) अन्वये अधिकार सुपूर्ति क्र. मआ/अधिकार सुपूर्ति /डीईएस/डीईएस/१/१४७३/दि.१०/१०/२०१२ ने सल्लागार (कामगार)यांना सुपूर्त करण्यात आले होते.

प्रशासकीय कामकाजाच्या सोईसाठी घरबांधणी व कर्ज या विभागाचे कामकाज जा.क्र.-मआ/उआ/से/२६५९ दि. १२/०८/२०१४ या आज्ञापत्रकान्वये उपआयुक्त (जिं.घ.) यांचेकडे सोपविण्यात आले आहे. तरी यापुढे घरबांधणी अग्रिम मंजूर करणे तसेच घरबांधणीसाठी दिलेल्या अग्रिमाची परतफेड पूर्ण झालेल्या सेवकांचा बोजा उतरविणे (Deed Release) या बाबतचे अधिकार उपआयुक्त (जिं.घ.) यांना सुपूर्त करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :-
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि)
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीस्तव सादर . . . . .

प्रतिः-
सर्व खातेप्रमुख
सर्व उपआयुक्त क्र १ ते ४
सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी. . . . . .

महापालिका आयुक्त कार्यालय
अधिकार सुपूर्त क्र.: मआ/डीईएल/१४८५
दिनांक : २६/५/१४

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.: मआ/ई/२५२
दिनांक : २६/५/२०१४

## अधिकार सुपूर्ती आदेश

विषय : अतिक्रमण विभागाकडील विविध करारनाम्यावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार उप आयुक्त (अतिक्रमण) यांना सुपूर्त करणेबाबत.
संदर्भ : मा. स्थायी समिती ठराव क्र.१७,दि.२/४/२०१४.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार करार करण्याचे अधिकार आम्हास प्रदान आहेत. प्रशासकीय सोयीसाठी अतिक्रमण विभागाकडील विविध करारनाम्यावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार मा. स्थायी समिती ठराव क्र.१७,दि.२/४/२०१४ ने उप आयुक्त (अतिक्रमण) यांना सुपूर्त करणेसाठी कलम ६९ (२) नुसार मान्यता देण्यात आली आहे.

अतिक्रमण विभागाकडील विविध करारनाम्यावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार उप आयुक्त (अतिक्रमण) यांना अधिकार सुपूर्त करण्यात येत आहेत. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या अधिन राहून या अधिकाराचा वापर करावयाचा आहे.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.

प्रत :-
१) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)/(विशेष)/इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहितीसाठी...

प्रति :-
१) मुख्य लेखापाल
२) मुख्य लेखापरिक्षक
३) उप आयुक्त (अतिक्रमण)
४) उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र. १ ते ४
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी...